किंमत - वार्षिक वर्गणी २००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक

३● पुनर्रचना
७● कल, अर्थविश्वातील दोन प्रवाहांचा...
१५● वैश्विक श्रमदलाचे बदलते अंतरंग
१९● अर्थबोधपत्रिका पुरवणी

खंड १६ : अंक १२ मार्च २०१८

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

वार्षिक वर्गणी २००/- रुपये **(परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website-http:// www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड १६ (अंक १२) मार्च २०१८**
**संपादक - अभय टिळक**

*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

**अर्थबोधपत्रिकेचा हेतू**

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# पुनर्रचना

चालू असणारे २०१८ हे वर्ष म्हणजे 'अर्थबोधपत्रिका' या प्रयोगाच्या द्विदशकी वाटचालीच्या पूर्तीचे वर्ष होय. १९९८ सालातील नोव्हेंबर-डिसेंबरचा अंक या स्वरूपात 'अर्थबोधपत्रिके'चे अवतरण झाले. सर्वसाधारण मराठी वाचकांच्या वाचनकक्षेमध्ये जे विषय सहसा आणि सहजासहजी येत नाहीत, अशा विषयांचा परिचय घडवत वाचकांच्या मनबुद्धीचा पैस विस्तारण्यास हातभार लावणे, हा 'अर्थबोधपत्रिके'च्या निर्मितीमागील मूळ हेतू. तो हेतू जपण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करीतच 'अर्थबोधपत्रिके'ची वाटचाल आजवर चालू आहे आणि पुढेही ती तशीच चालू राहील. आजवरची ही दोन दशकी वाटचाल सुरळीत राहिली तरी ती सोपी अजिबातच म्हणता येत नाही. मुळात, 'अर्थबोधपत्रिके'चा खप (सर्क्युलेशन) वाढवणे अथवा वाढवत राहणे, हे 'अर्थबोधपत्रिके'ची मातृसंस्था असणा-या भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे उद्दिष्ट कधीच नव्हते आणि आजही नाही. कोणीही वाचत नसले तरी मासिक काढत राहणे, असा याचा अर्थ अजिबातच नाही. तर, मुळातच गंभीर, अभ्यासपूर्ण, संशोधनाधारित, अ-प्रचलीत, रोजच्या जगण्याशी थेट संबंध नसणा-या रोचक घडामोडींसंदर्भात जिज्ञासा असणा-या वाचकांसाठी दर्जेदार वाचनसाहित्य निरलसपणे निर्माण करत राहणे, हाच संस्थेचा या सगळ्या खटाटोपामागील हेतू राहिलेला आहे. निखळ वाचनानंदासाठी आणि आपल्या जाणिवेच्या कक्षा सतत वाढवत राहण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून चाकोरीबाहेरील विषयांबाबत वाचन करणा-या वाचकांची एकूणांतील संख्या व प्रमाण हे मर्यादित, मोजकेच असणार याची पूर्ण कल्पना भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीस आहे. त्यांमुळे, 'अर्थबोधपत्रिके'चा खप अथवा वितरण प्रचंड नाही, याची खंत अथवा चिंता संस्थेने कधीच बाळगलेली नाही. वृत्तपत्रांसारख्या लोकमाध्यमांद्वारे जे विषय अथवा आपल्या जगण्याशी प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे निगडित असणा-या ज्या बाबींसंदर्भात अन्य लोकमाध्यमांद्वारे जी माहिती वा तपशील वाचकांच्या पुढ्यात अवतरत नाही असा रोचक वृत्तांत त्यांना उपलब्ध करून देणे, हे व्रत 'अर्थबोधपत्रिके'ने आजवर प्रयत्नपूर्वक व डोळसपणे जपलेले आहे.



किंबहुना, तीच या मासिकाच्या निर्मितीमागील आद्य प्रेरणा होय. याच हेतूशी प्रामाणिक राहत 'अर्थबोधपत्रिका' आजवरची दोन दशके आपल्या पुढ्यात सादर होते आहे. चालू कॅलेंडर वर्षातील फेब्रुवारी महिन्याचा अंक आपल्याला सादर करता न आल्याने या प्रवासात खंड पडला याचे मनोमन वैषम्य वाटते. त्याबद्दल आपल्यासारख्या सगळ्या उदार वाचकांची या ठिकाणी आम्ही मनःपूर्वक माफी मागतो. वास्तविक पाहता, फेब्रुवारी २०१८चा अंक पूर्णपणे तयारही झालेला होता. मात्र, अंक छपाईस रवाना करण्याच्या दिवशीच नेमका एक अतिशय दुर्धर अशी तांत्रिक समस्या संगणकाच्याबाबतीत उद्भवली आणि तयार झालेला संपूर्ण अंक अक्षरशः उडला ! सगळ्यांच फाइल्स एकाएकी उघडेचनात. संगणक मुळात चालूच होईना. युद्धपातळीवर प्रयत्न करू नही हाती काहीच न आल्याने 'अर्थबोधपत्रिके'चा फेब्रुवारीचा अंक आम्ही सादर करू शकलो नाही.

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेत - स्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

● ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.

● लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

आयत्या वेळी काही तरी नवीन मजकूर तयार करून अंमळ उशीरा का होईना पण फेब्रुवारी २०१८चा अंक वाचकांपर्यंत पोहोचवावा, असेही एकदा वाटून गेले. परंतु, तेही मनाला पटेना. कारण, अखेर कोणतेही प्रकाशन वाचकांच्या मनात स्वतःची म्हणून एक जागा निर्माण करत असते ते त्याच्या गुणवत्तेमुळे. साहजिकच, प्रकाशनाच्या निर्मितीशी संलग्न असलेल्या सर्वच घटकांची सर्वोच्च बांधिलकी असते ती त्या प्रकाशनाच्या दर्जाशी. संपादकाच्या लेखी सर्वाधिक महत्त्व असते ते प्रकाशनाच्या दर्जाची हानी होऊ नये या बाबीला. प्रकाशनाचे वेळापत्रक जपण्यास प्राधान्य देत अंकामध्ये प्रसिद्ध होणा-या मजकुराच्या गुणवत्तेशी तडजोड करायची की, प्रसंगी, अंक वाचकांच्या हाती देण्यास उशीर झाला तरी तो सहन करत मजकुराचा दर्जा अव्वल राखण्याबाबतची बांधिलकी जपायची, हा कोणत्याही संपादकाच्या पुढ्यातील एक अतिशय जटिल प्रश्न असतो. ‘अर्थबोधपत्रिके’च्या बाबतीत आपण माप टाकलेले आहे ते दुस-या पारड्यात. जाहिरातदारांचा लकडा, अनुदान पुरविणा-या कोणत्या तरी संस्थेचा दट्ट्या... यांसारख्या अथवा अशाच अन्य एखाद्या बाबीचे जोखड मानेवर नसल्यामुळेच, प्रकाशनाचे वेळापत्रक जपण्यासंदर्भात कारणवश सहन करावी लागणारी असमर्थता स्वीकारून अंकात प्रसिद्ध होणा-या मजकुराच्या गुणवत्तेबाबत तडजोड न करण्याचा पर्याय अंगीकारता आला. अर्थात, हे सगळे शक्य बनले ते केवळ आणि केवळ आपल्यासारख्या सगळ्या वाचकांनी व वर्गणीदारांनी ‘अर्थबोधपत्रिके’वर आजपर्यंत सतत व्यक्त केलेले प्रेम आणि दाखवलेला विश्वास यांची भक्कम शिदोरी जवळ असल्यामुळेच. आपले प्रेम आणि ‘अर्थबोधपत्रिके’सारख्या एका, तशा अ-साधारण उपक्रमाबाबत, आपल्या मनीमानसी वसत असलेली आस्था यांचे पाठबळ भविष्यातही अव्याहत मिळत राहील अशी आशाच केवळ नव्हे तर विश्वास वाटतो. अर्थबोधपत्रिकेची मातृसंस्था असणारी भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी ही संस्था आणि पर्यायाने ‘अर्थबोधपत्रिका’ सध्या स्थित्यंतराच्या एका मोठ्या पर्वामधून वाटचाल करते आहे. त्या स्थित्यंतरपर्वाचे काही ना काही हेलकावे ‘अर्थबोधपत्रिके’स आतापर्यंत बसत आलेले आहेत आणि येता काही काळ ते तसेच बसत राहतील, हे या ठिकाणी आवर्जून नमूद करायलाच हवे.



‘अर्थबोधपत्रिके’च्या माध्यमातून विचक्षण वाचकांना सादर करावयाचा मजकूर सर्वस्वी संस्थेमध्येच निर्माण करावयाचा, हे धोरण गेली २० वर्षे संस्थेने जपलेले आहे. ‘अर्थबोधपत्रिके’चे अंतरंग सजवणा-या लेखक-संपादकांच्या चमूमध्येही अलीकडील तीन वर्षांत बदल झाले. नवीन घडी बसण्याची प्रक्रिया आता खूपच प्रगतिपथावर असून येत्या सहाएक महिन्यांत तिची परिपूर्ती होईल. सर्वसाधारण परंतु जिज्ञासू वाचकांच्या नजरेस सहजासहजी न पडणारे विषय निवडून त्यांचा परिचय वाचनीय, सुटसुटीत शैलीमध्ये करून देणे, हा ‘अर्थबोधपत्रिके’मधून प्रकाशित होणा-या लेखनाचा एक आगळाच बाज होय. एखाद्या रोचक विषयावरील एखादा लेख निवडून त्याचा सरळसुलभ मराठी अनुवाद ‘अर्थबोधपत्रिके’च्या वाचकांपुढे सादर करणे, हा खाक्या कधीच नव्हता. तर, जिज्ञासा चाळवणारा एखादा विषय निवडून त्याचा शक्यतो सर्वांगीण परिचय, तटस्थपणे, कोठेही आपले मतप्रदर्शन न करता, अधिकृत अशा संशोधकीय व अभ्यासपूर्ण आधारभूत संदर्भसाहित्याच्या साहाय्याने वाचकांना करून देणे, ही शिस्त ‘अर्थबोधपत्रिके’चे अंतरंग सिद्ध करत असताना आजतागायत जपलेली आहे. त्यांमुळे, म्हटले तर हे साहित्य परभृत, परप्रकाशित ठरते आणि म्हटले तर स्वायत्त ठरते. मूळ आधारसाहित्याचा केवळ अनुवाद नसल्याने ‘अनुवादित’ असा शिक्का त्यांवर जसा सरळसोट मारता येत नाही; त्यांचप्रमाणे, ते स्वरूपतः स्वतंत्र लेखन नसल्यामुळे त्याला निखळ ‘सर्जनशील साहित्य’ असेही संबोधता येत नाही. या दोन लेखनप्रकारांचे कलम असणारे ‘अर्थबोधपत्रिके’तील साहित्य ‘अनुसर्जन’ या लेखनगटात समाविष्ट होते अथवा केले जाऊ शकते. अशा प्रकारचे वाचनसाहित्य निर्माण करणे हेही एक प्रकारचे लेखनव्रतच होय. ‘अर्थबोधपत्रिके’मधून आपल्या पुढ्यात सादर केल्या जाणा-या मजकुरावर आपल्यासारख्या सुजाण वाचकांनी आजवर स्वीकृतीची मोहोर सतत उमटवल्यामुळेच हे व्रत जपणे संस्थेस आणि ‘अर्थबोधपत्रिके’च्या निर्मितीशी संबंधित असलेल्या सगळ्यांनाच शक्य बनलेले आहे, हेही या ठिकाणी अतिशय नम्रपणे आवर्जून नमूद केलेच पाहिजे. ‘अर्थबोधपत्रिके’च्या सध्याच्या संक्रमणपर्वात आपण सगळे आमचे सहप्रवासी बनाल, असा विश्वास आहे. ■■

आर्थिक

# कल, अर्थविश्वातील दोन प्रवाहांचा...

अवघ्या तीनच महिन्यांपूर्वी आपल्या सगळ्यांच्या आयुष्यात प्रवेशलेले २०१८ हे वर्ष तसे फार लक्षणीय वर्ष ठरते. २००८ साली अमेरिकी ‘सबप्राइम’ कर्जांचा फुगा फुटून जे वित्तीय अरिष्ट त्यांतून प्रसवले त्याला यंदाच्या सप्टेंबर महिन्यात पुरते एक दशक पूर्ण होईल. त्या जबरदस्त दणक्यामुळे मुळापासून हादरलेली वैश्विक अर्थव्यवस्था पु-या १० वर्षांनंतर आता जरा कोठेही मान उचलताना दिसत असली तरी हे पुनरु त्थान सर्वत्र सारख्याच पद्धतीने घडून येते आहे, असे मात्र मुळीच नाही. अनेक देशांतील आर्थिक वाढीचा वेग आजही यथातथाच आहे. जरा कठीण शब्द वापरायचा तर जगातील काही देशांच्या अर्थव्यवस्थांमधील वाढ आजही क्षीणच दिसते. जगाच्या विकसित पट्ट्यातील प्रगत देशांच्या अर्थव्यवस्थांचे चित्र चांगल्यापैकी उजळ दिसते-भासते. परंतु, अर्थवेत्यांना बुचकळ्यात पाडणारा या सगळ्यांतील मुख्य भाग म्हणजे अनेक देशांतील महागाईचा तेवर मात्र आजही सरासरीने नरमच दिसतो. आर्थिक पुनरु त्थानाची प्रक्रिया आकार घेत असताना महागाईचा सरासरी दर मात्र फणा का आणि कसा उगारत नाही, यांबद्दल जगभरातील अनेक अर्थतज्ज्ञ विस्मयात पडलेले दिसतात. ज्या अर्थी महागाई अजूनही म्हणावी अशी मान वर काढत असल्याचे दिसत नाही त्या अर्थी आर्थिक मंदीचे मळभ अजूनही पुरते सरले नाही असे मानायचे का, या विचाराशी अनेक अर्थतज्ज्ञ आज झोंबी घेत आहेत. खास करून बुचकळ्यात पाडणारे चित्र आहे ते प्रगत देशांमधील महागाईचे. विकसित देशांच्या अर्थव्यवस्थांमधील महागाईचा नरमपणा कमालीचा चिवट दिसतो आहे. त्या त्या अर्थव्यवस्थांमधील मागणीचे मान सरासरीने उंचावले नाही तर महागाईचा हा नरमपणा हटणार नाही, असे अभ्यासकांचे अनुमान आहे. त्यावर उपाय म्हणून, मग, विकसित देशांमधील मध्यवर्ती बँकांना विस्तारवादी, उदार, सैल अशा पैसाधोरणाची कास धरणे भाग पडत राहील.



आर्थिक वाढीची प्रक्रिया गती पकडत असतानाही महागाई मात्र म्हणावी अशी न दिसण्यामागील कारणांचा माग काढत गेले तर ते सूत्र भिडलेले दिसते ते कच्च्या खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी. कच्च्या खनिज तेलाच्या वैश्विक बाजारपेठेत अलीकडे तेलाचे बाजारभाव झुकलेले दिसतात. तेलांच्या बाजारभावांतील या नरमाईमागे दोन कारणे मुख्यतः असल्याचे तज्ज्ञांचे निरीक्षण आहे. शेल वायू आणि तेल या दोन पर्यायी ऊर्जास्त्रोतांचे संशोधन-उत्पादन-वापर यावर अमेरिकेने एकवटलेले लक्ष, हे झाले त्या दोहोंतील पहिले मुख्य कारण. तर, लीबिया आणि नायजेरिया या दोन तेलउत्पादक राष्ट्रांनी त्यांच्या तेलउत्पादनामध्ये अलीकडील काळात घडवून आणलेली वाढ, हे झाले तेलाच्या बाजारभावांतील नरमाईमागील दुसरे कारण.

जागतिक पातळीवर बघितले तर, ग्राहक किंमत निर्देशांकानुसार मोजमाप केल्या जाणा-या महागाईची मात्रा येत्या वर्षात सरासरीने नरम राहण्याचीच चिन्हे सध्या तरी दिसतात. बाजारपेठेतील यच्चयावत वस्तू आणि सेवांच्या सरासरी किंमतपातळीमध्ये सातत्याने लक्षणीय वाढ घडत राहणे, ही ‘महागाई’ या संकल्पनेची व्याख्या गणली जाते. ग्राहक किंमत निर्देशांकामधील वाढीचा सरासरी वेग म्हणजे महागाईचा सरासरी वेग अथवा दर. महागाईच्या दराचे मोजमाप करतेवेळी अन्नधान्ये व इंधनांच्या बाजारभावांचा समावेश त्यांत केला नाही तर महागाईचा जो दर त्या आकडेवारीतून निष्पन्न होतो त्यांस महागाईचा गाभा दर (कोअर इन्फ्लेशन) असे म्हटले जाते. आजचे चित्र असे आहे की, ब-याच विकसित देशांमध्ये महागाईचा हा गाभा दर मलूल आहे. एकीकडे, देशोदेशींच्या ठोकळ उत्पादिताच्या वाढीचा सरासरी वेग हळूहळू वाढतो आहे. बेरोजगारीचे सरासरी प्रमाणही विकसित देशांमध्ये आता उतरणीला लागलेले आहे. असे असूनही महागाई मात्र मान टाकून पडलेली दिसते ती कशामुळे, हा प्रश्न आजघडीला अनेक अर्थतज्ज्ञांच्या पुढ्यात आहे. उभा युरो समुदाय, जपान, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, डेन्मार्क, नॉर्वे कोरिया...यांसारख्या जगाच्या विविध भागांत असणा-या देशांमधील महागाईबाबतचे आजचे चित्र असेच आहे. अर्थवेत्यांना उमज पडत नाही तो नेमका याचाच.

गंमत म्हणजे, महागाईच्या सरासरी दराबाबत देशोदेशींच्या मध्यवर्ती बँकांचे जे अनुमान वा अपेक्षा असतात त्यांहीपेक्षा महागाईचा सरासरी दर सध्या कमी आहे. अर्थव्यवस्थांमधील मागणी उंचावली नाही तर येत्या काळातही हे चित्र असेच राहण्याची शक्यतावजा धास्ती धोरणकर्त्यांना वाटते. आर्थिक पुनरु त्थान चालू झालेले असले तरी ते म्हणावे इतके दमदार नाही. ही आर्थिक वाढही पुन्हा सगळ्यांच देशांत तितक्याच सक्षमपणे घडून येते आहे, असेही नाही. महागाईचा सरासरी दरही तकवा धरण्याची चिन्हे दिसत नाहीत. विकसित अर्थव्यवस्थांमधील हे चित्र असे दिसण्यास काही प्रमुख कारणे आहेत, असे अभ्यासकांचे म्हणणे दिसते. एक म्हणजे, जगातील विकसित पट्ट्यात असणा-या जवळपास सगळ्यांच देशांमध्ये वयोवृद्ध, ज्येष्ठ नागरिकांचे त्या त्या देशातील एकंदर लोकसंख्येमध्ये असणारे सरासरी प्रमाण वाढते आहे. ज्येष्ठांच्या तुलनेत तरूण लोकसंख्येचे सरासरी उत्पन्न, उपभोगावरील खर्चाची सरासरी पातळी, बचत तसेच गुंतवणुकीची प्रवृत्ती तुलनेने अधिक राहते. एकूण लोकसंख्येमधील ज्येष्ठांचे प्रमाण सरासरीने वाढते असल्याने निवृत्तांचे प्रमाणही वाढते आहे. या दोन गटांना सामाजिक सुरक्षेचे कवच पुरवण्यापोटी शासनसंस्थेला मोठा खर्च करणे भाग पडते. ज्येष्ठ तसेच निवृत्तांची सर्वसाधारण प्रवृत्ती खर्चाबाबत हात आखडता घेण्याकडे असल्याने बाजारपेठेत मागणीची ऊबही म्हणावी अशी जाणवत नाही. तिसरीकडे, बेरोजगारीचे प्रमाण सरासरीने उतरत असले तरी श्रमिकांच्या सरासरी वेतनदरामध्ये म्हणावी अशी वाढ दिसत नाही. श्रमिकांच्या उत्पादकतेमध्ये सरासरीने होणारी वाढच मुदलात अतिशय क्षीण असल्यामुळे वेतनदरातील वाढ मंदतेज आहे, असे अभ्यासकांचे विश्लेषण सांगते. चौथ्या बाजूने बघितले तर, विकसित देशांमध्ये तरु णांचे एकंदर लोकसंख्येतील प्रमाण घटते राहिल्याने उत्पादनप्रक्रियेमध्ये यंत्रमानवांचा, म्हणजेच पर्यायाने, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याकडे कॉर्पोरेट विश्वाचा वाढता कल दिसतो. त्यांमुळे नव्याने होणा-या रोजगारनिर्मितीवर त्याची आच येते आहे. अशा सगळ्या गुंत्यापायी मागणी वाढावी कशी, हा प्रश्न जटिल बनतो आहे. परिणामी, विकसित देशांमधील पैसाधोरण येत्या काळात उदार व सैल राहण्याचीच शक्यता अधिक.



**महागाईचे भारतातील चित्र**

भारतीय अर्थव्यवस्थेतील महागाईच्या प्रक्रियेमध्ये संरचनात्मक (स्ट्रक्चरल) स्वरूपाचे स्थित्यंतर घडून येते आहे, अशी चर्चा अर्थाभ्यासकांमध्ये अलीकडील काळात प्रकर्षाने चालू झालेली दिसते. ग्राहक किंमत निर्देशांकानुसार निष्पन्न होणारा महागाईचा सरासरी दर, महागाईबाबतच्या व्यावसायिक अंदाजांपेक्षा सातत्याने खालच्या स्तरावरच राहण्याचे वास्तव अलीकडील पाचएक वर्षांमध्ये पुढ्यात अवतरते आहे. सर्व जगभरातच एकंदरीने असे चित्र आताशा दिसते. भारतीय अर्थव्यवस्थेमधील महागाईची वाटचाल अलीकडील काही वर्षांमध्ये कशी राहिलेली आहे, याचा आढावा घेतला तर मोठे मनोज्ञ चित्र आपल्यासमोर साकारते. १९७७ हे वर्ष आरंभबिंदू म्हणून आपण गणले तर, महागाईच्या वाटचालीचे चार ठळक टप्पे जाणवतात. १९७७ सालानंतरची एकूण २३ वर्षे अशी दिसतात की ज्यांदरम्यान भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये महागाईचा वार्षिक सरासरी दर सातत्याने नऊ टक्क्यांच्या परिघात राहिला. २००० ते २००५ या त्या नंतरच्या पाच वर्षांच्या काळात महागाईचा वार्षिक सरासरी दर चार टक्क्यांच्या आसपास राहिला. ही पाच वर्षे महागाईच्या दृष्टीने नरमाईची गेल्यानंतर पुन्हा २००६ ते २०१४ या नऊ वर्षांदरम्यान महागाईने फणा वर काढला. या काळात महागाईचा वार्षिक सरासरी दर पुन्हा नऊ टक्क्यांच्या घरात राहिला. आता, अगदी अलीकडे, म्हणजे, २०१४ सालानंतर सातत्याने दिसणारा महागाईचा अतिशय कमी असा वार्षिक सरासरी दर म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेतील महागाईच्या चित्रात साकारत असलेला नमुनेदार बदल गणायचा का, असा प्रश्न अर्थविश्लेषक विचारत आहेत.

भारतीय अर्थव्यवस्थेतील महागाईस फुंकर घालणारे तीन-चार महत्त्वाचे घटक दिसतात. अन्नधान्ये आणि खनिज तेल या दोन जिनसांची भाववाढ यथावकाश सर्वसाधारण भाववाढीमध्ये परावर्तित होते, हा अनुभव नित्याचाच आहे. डॉलरच्या तुलनेत भारतीय रु पयाचा मूल्य-हास होणे, हे देशी महागाईला इंधनपुरवठा करणारे तिसरे कारण. रु पयाचा मूल्य-हास घडून आला की आयात महाग बनते आणि महागाईला हे चौथे कारण हातभार लावते.

आता, कच्च्या खनिज तेलाची वैश्विक बाजारपेठ आणि भारतातील शेती या दोहोंत, अलीकडील काळात, संरचनात्मक (स्ट्रक्चरल) स्वरूपाचे परिवर्तन घडून येते आहे, असे अभ्यासकांचे निरीक्षण आहे. अभ्यासकांचे हे निरीक्षण यथार्थ ठरले तर भारतीय अर्थव्यवस्थेतील महागाईच्या प्रक्रियेतही तसेच संरचनात्मक स्थित्यंतर घडून येईल, असे मानण्यास जागा आहे. त्यांमुळे, कच्च्या खनिज तेलाची वैश्विक बाजारपेठ आणि भारतीय शेती या दोहोंत साकारत असलेल्या बदलांचे स्वरूप नीट जाणून घेणे या ठिकाणी उपयुक्त व उचित ठरेल.

कच्च्या खनिज तेलाच्या जागतिक बाजारपेठेमध्ये कच्च्या खनिज तेलाच्या बाजारभावांत घडून येणारी वाढ आणि परिणामी भारतीय अर्थव्यवस्थेत सर्वसाधारण महागाईच्या रूपाने त्या दरवाढीचे जाणवणारे पडसाद या दोहोंचा संबंध आखाती देशांमधील भू-राजकीय वास्तव व त्यांतील अस्थिरता यांच्याशी जखडलेला आहे. आजवरचे चित्र हे साधारणपणे याच प्रकारचे राहिलेले असले तरी, तेलाच्या आजघडीच्या वैश्विक बाजारपेठेचे स्वरूप पूर्वीच्या तुलनेत प्रचंड बदललेले आहे. पारंपरिक खनिज ऊर्जास्त्रोतांचे संशोधन व खनन यांत कमालीच्या प्रगत अशा अत्याधुनिक तंत्रशास्त्राचा वापर आताशा चौफेर वाढलेला आहे. त्याच प्रमाणे ऊर्जेचे नवनवीन पर्यायही आता हाताशी येत आहेत. शेल वायू तसेच तेलाचा इंधन म्हणून आताशा वापर वाढत्या प्रमाणात केला जाताना दिसतो. परिणामी, तेल निर्यातदार देशांच्या संघटनेचे (ऑर्गनायझेशन ऑफ पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कन्ट्रीज् - ओपेक) सदस्य असणा-या देशांकडून केल्या जाणा-या तेलाच्या पुरवठ्याला आता पर्याय उपलब्ध होतो आहे अथवा झालेला आहे.

साहजिकच, कच्च्या खनिज तेलाच्या पुरवठ्याबाबत 'ओपेक'चे सदस्य असणा-या राष्ट्रांवरील भारताचे अवलंबन अलीकडील काळात बरेचसे घटलेले आहे. दुसरीकडे, शेल वायू आणि तेलाचा पुरवठादार म्हणून उत्तर अमेरिकेचा जागतिक क्षितिजावर झपाट्याने उदय घडून येतो आहे अथवा आलेला आहे. शेल वायू आणि शेल तेलाच्या पुरवठ्यासंदर्भात दोन बाबी अतिशय वैशिष्ट्यपूर्ण ठरतात. ऊर्जास्त्रोतांचे वैश्विक चित्रच जणू त्यांपायी पालटून जाण्याच्या बिंदूवर येऊन ठेपलेले आहे.



शेल तेल व वायूचा हा नव्याने उदय होत असलेला पर्यायी पुरवठा स्त्रोत दोन बाबींनी वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. खनिज तेलाचा एक बॅरल १५९ लिटरचा असतो. ५० अमेरिकी डॉलरला एक बॅरल, या दराने शेल तेलाचा असा १५९ लिटरचा एक बॅरल किफायतशीर ठरू शकतो, हे शेल तेलाच्या पुरवठ्यासंदर्भातील पहिले वैशिष्ट्य. तर, बाजारभावांतील बदलांना पुरवठ्याचा त्वरित प्रतिसाद मिळणे, हे शेल तेलाच्या पुरवठ्यासंदर्भातील दुसरे वैशिष्ट्य ठरते. याचा संदर्भ आहे तो शेल तेलाच्या साठ्यांचे शोधन, खनन, शुद्धीकरण आणि वितरण या संपूर्ण प्रणालीमध्ये अंतर्भूत असणा-या तंत्रशास्त्राशी. भूगर्भात आढळणा-या खनिज तेलाच्या साठ्यांचे नवशोधन व खनन यांसाठी आवश्यक असणारा भांडवली खर्च हा शेल तेलाच्या नवसाठ्यांचे शोधन व खनन करण्यासाठी कराव्या लागणा-या भांडवली खर्चाच्या तुलनेत अधिक असतो. त्यांमुळे, कच्च्या खनिज तेलाच्या बाजारात मागणी उंचावल्यानंतर तेलाच्या मागणी व पुरवठ्याचे समीकरण बदलून तेलाचे बाजारभाव वाढू लागले की ती वाढीव मागणी पुरी करण्यासाठी तेलाचा पुरवठा वाढवायचा तर नवशोधन व खनन यांसाठी, शेल वायूच्या नवशोधन व खननाच्या तुलनेत अधिक भांडवली गुंतवणूक करणे भाग पडते. मग, वाढीव पुरवठ्याबाबत हात आखडता घेऊन कच्च्या खनिज तेलाच्या बाजारपेठेत तेलाचे बाजारभाव वाढू देण्याचा खाक्या 'ओपेक'चे सदस्य आजवर सतत अवलंबत आलेले आहेत. आता, शेल वायू व तेलाचा पर्याय हाताशी आलेला असल्याने कच्च्या खनिज तेलाच्या वैश्विक बाजारपेठेवर आणि पर्यायाने कच्च्या खनिज तेलाच्या बाजारभावांवर असणारी 'ओपेक'च्या सदस्य देशांची पकड आताशा ढिली पडू लागलेली आहे.

शेल वायू आणि तेलाच्या उपलब्धतेमुळे कच्च्या खनिज तेलाच्या बाजारभावांना कमाल दरपातळीची एक अदृश्य मर्यादा पडायला सुरुवात झालेली आहे, हे मात्र निश्चित. शेल तेलाचा एक बॅरल ५० अमेरिकी डॉलर या किमतीलाही किफायतशीर ठरत असल्यामुळे, कच्च्या खनिज तेलाचे बाजारभाव प्रति बॅरल ५० डॉलरपेक्षा वर जरी चढले तरी त्या पातळीवर ते फार काळ टिकू शकणार नाहीत, हे अर्थशास्त्रीय वास्तव उघड आहे.

## तांत्रिक सुधारणा आणि शासकीय प्रतिसाद

हे वास्तव नीट समजावून घेतले तर कळायला अवघड नाही. समजा, कच्च्या खनिज तेलाचे बाजारभाव दर बॅरलमागे ५० डॉलरहून अधिक चढले तर शेल वायू व तेलाची मागणी वाढेल. वाढत्या मागणीची तोंडमिळवणी घडवून आणणे हे शेल वायू व तेलाच्या वाढीव उत्पादनाद्वारे शक्य आहे. म्हणजेच, दुस-या भाषेत बोलावयाचे तर, कच्च्या खनिज तेलाचे खुल्या बाजारातील दर आता या पुढे शेल वायू व तेलाच्या सीमान्त उत्पादनखर्चाच्या पातळीकडे ढकलले जातील. या सगळ्या चर्चेचा निष्कर्ष काय...? आखातातील भू-राजकीय घटक आणि त्यांतील हेलकाव्यामुळे उद्भवणारे आनुषंगिक अस्थैर्य वा अनिश्चितता, हा भारतीय अर्थव्यवस्थेतील तेलाच्या बाजारभावांसंदर्भात त्रासदायक ठरत आलेला घटक आता पूर्वीइतका कळीचा वा संवेदनशील राहिलेला नाही, हा झाला पहिला धडा. ओपेकचा भू-राजकीय दबाव आणि मध्य-पूर्वेतील भू-राजकीय संवेदनशीलता या दोहोंच्या लहरी कचाट्यातून, तेलसंशोधन व खनन यांच्याशी निगडित तंत्रशास्त्रातील प्रगतीपायी भारतीय तेलव्यवहाराची सुटका शक्य बनलेली आहे, हा या सगळ्या उहापोहाचा दुसरा निष्कर्ष.

भारतीय अर्थव्यवस्थेतील महागाईस खतपाणी पुरविणारा दुसरा महत्त्वाचा कारणभूत घटक म्हणजे अन्नधान्याची दरवाढ. त्यांतही पुन्हा तुलनेने अधिक उपद्रवकारक घटक म्हणजे तृणधान्यांच्या उत्पादनातील हेलकावे व त्यांपायी तृणधान्यपिकांच्या बाजारभावांतील चढउतार. अलीकडील काही वर्षांतील अनुभव असा आहे की, तृणधान्याच्या उत्पादनातील हेलकावे पूर्वीच्या मानाने कमी आणि सौम्य ठरत आहेत. या बदलामागे जी दोन कारणे दिसतात त्यांतील एक आहे ते कृषितंत्रशास्त्रीय प्रगतीशी निगडित तर दुसरे आहे निखळ प्रशासकीय. पर्जन्यमानातील चढउतारांशी मुकाबला करण्याची भारतीय शेतीची अंगभूत क्षमता उंचावलेली आहे. परिणामी, पर्जन्यमानात चढउतार झाले तरी खरीपाच्या हंगामातील धान्योत्पादनाला त्याचे फार मोठे आणि तीव्र हेलकावे बसण्याचे प्रमाण आता सौम्य व कमी झालेले अनुभवास येते. प्रशासकीय पातळीवरू न धान्यखरेदीबाबत मिळू लागलेल्या प्रतिसादाची या बदलाला जोड मिळते आहे.



पंजाब, हरियाना, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश यांसारख्या तृणधान्यप्रधान शेतीप्रणाली असणा-या राज्यांतील शासकीय धान्यखरेदी यंत्रणेची क्षमता अलीकडील काही वर्षांत चांगल्यापैकी सुधारलेली आहे, असे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे निरीक्षण सांगते. त्याच वेळी, तांदूळ व गहू या दोन मुख्य तृणधान्यांच्या आधारभूत किमतींमध्ये सातत्याने लक्षणीय वाढ घडवून आणण्याचे धोरणही शासकीय पातळीवरू न अलीकडे नेटाने राबविण्यात येत असल्याचे आपण पाहतो आहोत. या दोहोंचा एकत्रित परिणाम म्हणजे तृणधान्य पिकांच्या उत्पादनाबाबत आताशा चांगल्यापैकी स्थैर्य जाणवते आहे.

असे सगळे असले तरीही २००७ ते २०११ या पाच वर्षांच्या काळात अन्नधान्य पिकांच्या बाजारभावांत आपल्या देशात लक्षणीय अशी दरवाढ अनुभवास आली. अर्थात, अन्नधान्य जिनसांच्या त्या महागाईला शासकीय पातळीवरू न उचित असा प्रतिसादही त्वरेने देण्यात आला, हेही इथे नमूद केलेच पाहिजे. पहिले म्हणजे, आधारभूत किमतींमधील वाढीचे सरकारने सुसूत्रीकरण घडवून आणण्याला प्राधान्य दिले. कृषी उत्पादनांच्या बाजारपेठांवरील निर्बंध घटवत त्या अधिकाधिक खुल्या व मुक्त कशा होतील, यांवर भर देण्यात आला. आणि तिसरे म्हणजे, महागाईचे नियंत्रण करण्याच्या उद्दिष्टाला केंद्रस्थानी ठेवत पैसाधोरणाच्या प्राधान्यक्रमात 'इन्फ्लेशन टार्गेटिंग'च्या धोरणाचा सरकारने अंगीकार केला.

एकूण काय तर, ऊ र्जेच्या क्षेत्रातील तंत्रशास्त्रीय सुधारणा, त्यांपायी, शेल वायू व तेलासारख्या एका नवीन व खनिज तेलाला पर्याय ठरणा-या ऊ र्जास्त्रोताच्या शोधन व खननासाठी आवश्यक ठरणा-या भांडवली खर्चात शक्य बनलेली बचत याद्वारे ऊर्जा क्षेत्राचे सारे अर्थकारणच बदलते आहे. अन्नधान्याच्या बाजारभावांसंदर्भातील धोरण आणि शेतमालाच्या बाजारपेठीय व्यवस्थेतील सुधारणा या दोहोंपायी तृणधान्य पिकांचे उत्पादन, शासकीय खरेदी व साठवणूक यांच्या प्रणालीत सुधारणा होऊन धान्यपिकांच्या दरवाढीचे वास्तवही पालटते आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील महागाईच्या वास्तवामध्ये अलीकडील काही वर्षांत जे नमुनेदार स्थित्यंतर अनुभवास येते आहे, त्यांमागील कार्यकारणभाव असा बहुमिती दिसतो. ■■

सामाजिक

# वैश्विक श्रमदलाचे बदलते अंतरंग

बरोबर १० वर्षांपूर्वी अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये अवतरून यथावकाश उभ्या वैश्विक अर्थकारणात धुमाकूळ घालणा-या वित्तीय अरिष्टाच्या तडाख्यामुळे पार गळाठलेली जागतिक अर्थव्यवस्था आताशा कोठे अंमळ मान वर उचलायला लागलेली आहे. चालू कॅलेंडर वर्षात, म्हणजेच, २०१८ साली जागतिक उत्पादनवाढ साधारणपणे चार टक्क्यांच्या परिघात राहील, असा वैश्विक स्तरावरील अर्थसंशोधन संस्थांचा आजघडीचा अंदाज आहे. जागतिक उत्पादनवाढीचा वेग या प्रकारे हळूहळू का होईना पण बाळसे धरत असताना या पुनरुत्थानाचे जागतिक स्तरावरील श्रमांच्या बाजारपेठेत कशा प्रकारचे पडसाद संभवतात हा सगळ्यांच्याच कुतूहलाचा आणि त्यांहीपेक्षा अधिक उत्कंठेचा विषय बनतो आहे. आंतरराष्ट्रीय श्रमसंघटनेने संकलित केलेल्या आकडेवारीनुसार, जागतिक स्तरावर बेरोजगारीचा सर्वसाधारण दर २०१७ साली सरासरीने ५.६ टक्के इतका दिसला. चालू कॅलेंडर वर्षात बेरोजगारीचा हाच सरासरी दर साधारणपणे ५.५ टक्के असा असेल, असा आंतरराष्ट्रीय श्रमसंघटनेचा अंदाज आहे. गेली तीन ते चार वर्षे बेरोजगारीचा हा सरासरी दर जागतिक स्तरावर सतत वाढता कलच दाखवत होता. आता, २०१८ साली पहिल्यांदाच तो कल बदलत असल्याची सुचिन्हे दिसायला लागलेली आहेत.

एकंदरीने हे चित्र दिलासादायक असले तरी, वैश्विक स्तरावरील श्रमदलाच्या अंतरंगात अलीकडील काळात बदलांचे जे नवीन तरंग दृष्टोत्पत्तीस पडत आहेत ते मात्र बुचकळ्यात टाकणारे असेच आहेत. एकीकडे रोजगाराच्या शोधार्थ श्रमदलात प्रवेश करणा-यांची संख्या जागतिक स्तरावर वाढते आहे. तर, त्याच वेळी जगभरातील बेरोजगारांच्या संख्येतही वाढ घडून येताना दिसते. बेरोजगारांची जगाभरातील संख्या चालू वर्षात साधारणपणे २० कोटींच्या घरात असेल. तर, येत्या वर्षात, म्हणजे, २०१९साली त्या संख्येत अदमासे १३ कोटींची भर पडेल असा अभ्यासकांचा कयास आहे.



सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे, वरकरणी ढोबळ दिसणा-या या वास्तवाच्या पोटात जे सूक्ष्म असे गुणात्मक बदल साकारत आहेत, ते खरोखरच चिंतनीय आणि विवंचना वाढविणारे असेच आहेत. रोजगारवाढीचा जागतिक स्तरावरील सरासरी दर जरी नेमस्त दिसत असला तरी दुसरीकडे 'संकटप्रवण' (व्हल्नरेबल) म्हणून गणल्या जाणा-या रोजगारांत सर्वत्रच कमी-अधिक प्रमाणात वाढ होताना दिसते आहे. स्वयंरोजगाराचा पर्याय चोखाळणारे, ज्या उद्योगांत मुख्यत्वेकरून कुटुंबातील सदस्यच काम करतात अशा उद्योगव्यवसाय घटकांतील श्रमिकांचा समावेश 'संकटप्रवण' रोजगार मिळालेल्यांच्या या गटात केला जातो. या गटातील रोजगार, त्याचे सातत्य, त्यांद्वारे संबंधितांना मिळणारा मेहेनताना या सा-यांच बाबी विलक्षण अस्थिर आणि दोलायमान असतात. या प्रकारात मोडणा-या रोजगारांत होत राहणारी वाढ सरासरीने रोखण्यात जागतिक समुदायाला हळूहळू येत असलेले यश, साधारणपणे, २०१२ सालानंतर खंडित झालेले अथवा होत आलेले दिसते.

जागतिक स्तरावर २०१७ साली तब्बल १४० कोटी श्रमिक संकटप्रवण रोजगारांत रोजीरोटी कमावत होते, असा अभ्यासकांचा हिशेब आहे. टक्केवारीच्या परिभाषेत बोलायचे झाले तर, २०१७ साली जगभरात जेवढे म्हणून श्रमिक होते त्यांतील जवळपास ४२ टक्के श्रमिक संकटप्रवण रोजगारांत गुंतलेले होते. ही झाली वैश्विक सरासरी. ज्यांना आपण 'उभरत्या अर्थव्यवस्था' (इमर्जिंग इकॉनॉमिज्) असे संबोधतो, अशा अर्थव्यवस्थांमध्ये हेच प्रमाण दिसले ४६ टक्के इतके. तर, जगाच्या विकसनशील पट्ट्यातील देशांमध्ये संकटप्रवण रोजगारसंधींमध्ये रोजीरोटी कमावणा-यांचे एकूणांतील प्रमाण २०१७ साली होते ७६ टक्के इतके प्रचंड. हे चित्र अस्वस्थ करणारे असेच आहे. परंतु, या सगळ्यांपेक्षाही चिंतेची अधिक गहिरी बाब म्हणजे, संकटप्रवण रोजगारांत घट होत जाण्याचा कल आताशा उलटा फिरताना दिसत असल्यामुळे, श्रमांच्या जागतिक स्तरावरील बाजारपेठेत संकटप्रवण रोजगारसंधींमध्ये फिरून एकदा वाढ घडवून आणणारे अथवा वाढ घडून येण्याचे पर्व अवतरते आहे किंवा कसे, अशी आशंका जगभरातील अर्थवेत्त्यांना आणि धोरणकर्त्यांना आता सतावू लागलेली आहे.

## गरिबी आणि संकटप्रवण रोजगार

संकटप्रवण रोजगारात वाढ होत राहण्याच्या या प्रक्रियेला आळा घालणे, हे या पुढील काळातील एक मोठेच आव्हान ठरेल. येती दोन ते तीन वर्षे जगभरातील संकटप्रवण रोजगारात दरवर्षी साधारणपणे १ कोटी ७० लाखांची भर पडेल, असा आंतरराष्ट्रीय श्रमसंघटनेचा अदमास आहे. या ठिकाणी, संकटप्रवण रोजगार, अशा संकटप्रवण रोजगारात घडून येत असलेली वाढ आणि दारिद्र्याच्या प्रमाणात घट होण्याचा अलीकडील काळात उतरणीला लागलेला वेग यांतील आंतरसंबंध स्पष्ट व्हावा. चांगल्या गुणवत्तेचा रोजगार पुरेशा प्रमाणात निर्माण होणे, हे दारिद्र्याच्या दुष्टचक्राला भेदणारे हमीदार 'चॅनेल' गणले की, संकटप्रवण रोजगारांत होत असलेली वाढ हे दारिद्र्य निवारणाच्या प्रक्रियेतील अडथळा का व कसे ठरते आहे, ते समजणे सोपे होते. जगभरातील अनेक समाजसमूहांमधील काही घटकांच्या जगण्याभोवती भीषण दारिद्र्याचा पिढ्यान्पिढ्या आवळलेला फास, संकटप्रवण रोजगाराच्या वाढत्या फैलावापायी, सैल होण्याच्या शक्यता अंधुक बनतात ही या सगळ्यांतील चिंतेची मुख्य बाब ठरते.आंतरराष्ट्रीय श्रमसंघटनेच्या अलीकडील अभ्यासानुसार, उत्पन्न अथवा उपभोगावरील खर्च दर दिवशी दर माणशी दोन डॉलरपेक्षाही कमी असणा-यांची जगभरातील विकसनशील व उभरत्या अर्थव्यवस्थांमधील संख्या आजमितीस साधारणपणे ३० कोटींच्या घरात भरते. विकसनशील देशांचा विचार केला तर, या गटात समाविष्ट असलेल्या देशांमध्ये दरवर्षी श्रमदलात घडून येणा-या वाढीच्या तुलनेत, गरिबीच्या प्रमाणात घट घडवून आणण्याचा वार्षिक सरासरी वेग तोकडा पडत असल्याचे वास्तव डोळ्यांत खुपत राहते.

पराकोटीच्या दारिद्र्यातील जिणे पदरी आलेल्यांची जगभरातील संख्या सद्यःस्थितीमध्ये सुमारे १२ कोटींच्या घरात पोहोचण्याचा अंदाज या क्षेत्रातील अभ्यासकांनी मांडलेला आहे. कोणत्या ना कोणत्या प्रकारचा रोजगार मिळालेल्यांमध्ये, या प्रकारचे जगणे भाग पडलेल्यांचे प्रमाण आजघडीला जवळपास ४० टक्के इतके भरते. या गटात समाविष्ट असणा-यांच्या संख्येमध्ये घट घडवून आणण्याबाबत उभरत्या अर्थव्यवस्थांना तुलनेने अधिक चांगले यश प्राप्त होते आहे, ही बाब लक्षणीय ठरावी.



बेरोजगारीच्या प्रमाणातील कल अगदी अलीकडे बदलाची (म्हणजेच, उताराची) दिशा दाखवायला लागलेला आहे, ही त्यांतल्यात्यांत समाधानाची बाब. यामुळे दिलासा वाटावा हे स्वाभाविक असले तरी याच वास्तवाच्या काही गुणात्मक पैलूंकडे काणाडोळा करून चालणार नाही. कारण या प्रत्येक पैलूसंदर्भात धोरणात्मक पातळीवर निरनिराळ्या स्वरूपाची उपाययोजना करणे येत्या काळात अनिवार्य ठरणार आहे.

विकसित देशांचा विचार केला तर, चालू कॅलेंडर वर्षात बेरोजगारीचा अपेक्षित असणारा सरासरी ५.५ टक्के इतका दर हा २००७ सालानंतरचा किमान दर शाबीत होईल. असे असले तरी, अनेक देशांमध्ये आजमितीला उपलब्ध असणा-या मनुष्यबळाचा पुरेपूर वापर घडून येताना दिसत नाही. दुस-या भाषेत सांगायचे तर मनुष्यबळाचा हा अकार्यक्षम वापर वा हेळसांड ठरते. या वास्तवाचेही पुन्हा दोन उपपैलू आहेत. एक म्हणजे, श्रमदलात प्रवेश करण्यास अनुत्सुक असणारे बरेच जण अनेक देशांत आढळून येतात. तर, पूर्ण वेळचा चांगला उत्पादक स्वरूपाचा रोजगार मिळाला तर तो पदरात पाडून घेण्याची मानसिक तयारी असूनही तशी सुयोग्य रोजगारसंधी उपलब्ध न झाल्यामुळे सक्तीने अर्धवेळ काम स्वीकारणारेही अनेक जण अनेक देशांत आज आढळून येत आहेत.

जगातील उभरत्या अर्थव्यवस्थांचा विचार केला तर, २०१४ ते २०१७ या काळादरम्यान, मंदीपायी बेरोजगारीच्या सरासरी दरात एकंदरीने वाढच घडून आल्याचे संबंधित आकडेवारी सांगते. बेरोजगारांच्या संख्येतही तिथे भर पडते आहे. चालू कॅलेंडर वर्षात ही भर सुमारे चार लाखांची असेल अशी अपेक्षा आहे. तर, येत्या काळात तिच्यात जवळपास तिपटीने भर पडेल, असे अंदाज अभ्यासक वर्तवताना दिसतात.

विकसनशील देशांच्या पट्ट्यातील चित्रही जवळपास असेच संभवते. २०१८ आणि २०१९ या दोन वर्षांत, जगातील विकसनशील देशांमधील बेरोजगारांच्या संख्येत प्रत्येक वर्षी अदमासे पाच लाखांची भर पडेल, असे अभ्यासकांचे अनुमान सांगते. निकृष्ट प्रतीचा रोजगार आणि गरिबी यांचे साहचर्य तोडण्याचे आव्हान अनेक विकसनशील देशांप्रमाणेच उभरत्या अर्थव्यवस्थांच्याही पुढ्यात येत्या काळात उभे ठाकेल, असे दिसते. ■■

पुरवणी

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## सामाजिक अभिसरण आणि आपण

विवेक समूहाच्यावतीने 'सामाजिक अभिसरण आणि आपण' या मध्यवर्ती सूत्राभोवती गुंफलेल्या एका खुल्या चर्चासत्राचे आयोजन पुणे येते १० फेब्रुवारी २०१८ या दिवशी करण्यात आले होते. उदारीकरणानंतरच्या गेल्या सुमारे पाव शतकादरम्यान भारतीय समाजात सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, प्रादेशिक, भाषिक....अशा विविध स्तरांवर प्रचंड प्रमाणात घुसळण चालू झालेली आहे. भारतीय समाजातील जवळपास सर्वच स्तरांना कवेत घेणा-या या स्थित्यंतराचे काही आयाम निरखणे आणि त्यांबाबत खुले, मनमोकळे आदानप्रदान करणे, हा त्या उपक्रमामागील हेतू होता. समाजाच्या विविध क्षेत्रांत सक्रिय असणारे अभ्यासक व विचारवंत यांना एका व्यासपीठावर आमंत्रित करून सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेला अलीकडील काळात लाभत असलेल्या नानाविध परिमाणांबाबत विश्लेषक मंथन घडवून आणण्याच्या त्या प्रयत्नादरम्यान साकारलेल्या विचारविमर्शाचे काही कवडसे अर्थबोधपत्रिकेच्या वाचकांसाठी या ठिकाणी सादर करत आहोत. ग्रंथाली वाचक चळवळीसारख्या एका अभिनव उपक्रमाचे प्रवर्तक **दिनकर गांगल** यांनी **'संस्कृतिकरण : भूतकाळाचा भविष्याशी संवाद - वर्तमानाच्या माध्यमातून'** या सूत्राला अनुलक्षून त्यांचे विश्लेषण मांडले. विख्यात कवयित्री आणि लेखिका **डॉ. अरुणा ढेरे** यांनी **'विचारसरणी आणि कला-संस्कृती यांचे परस्परसंबंध'** या संदर्भातील त्यांचे विवेचन सादर केले. तर, 'दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स' (डिक्की) या संस्थेचे अध्वर्यू **मिलिंद कांबळे** यांनी **'दलित उद्योजकता आणि दलित चळवळ'** या संदर्भातील विचार मांडले. बदलत्या भवतालाबद्दलचे आपले आकलन प्रगल्भ बनवणा-या या मंथनाद्वारे वर्तमानाचे आपले वाचन अधिक समधात बनावे, हीच अपेक्षा.



### (१) स्वत्व जपणे हीच मोठी कसोटी

**● दिनकर गांगल**

आज आपण सगळेच एका मोठ्या सर्वंकष स्थित्यंतराच्या पर्वामधून पुढे सरकतो आहोत. आर्थिक बदलांना आपल्या समाजात प्रारंभ झाल्यानंतर उदारीकरणाद्वारे परकीय संस्कृती, तंत्रज्ञान, मूल्यसंचय, जीवनरीती यांच्याशी आपल्या समाजाचे आदानप्रदान ाधिक घनिष्ठपणे घडून येऊ लागल्याचे वास्तव आपण सगळेच आजघडीला अनुभवतो आहोत. या सगळ्या बदलांपायी, आणि मुख्यतः अपूर्व वेगाने साकारत असलेल्या तंत्रशास्त्रीय प्रगतीपायी आपल्या सगळ्यांच्याच जगण्याला प्रचंड वेग आलेला आहे. त्यांमुळे केवळ स्पर्धाच काय ती वाढलेली आहे असे नाही. तर, आपल्या जगण्याचा, जगण्याच्या मुळाशी असलेल्या जाणिवांचा पोतही आरपार बदलतो आहे. वाढत्या आर्थिक आणि भौतिक समृद्धीपायी समाजाच्या विविध स्तरांतील समूहांना आताशा मोठ्या प्रमाणावर सुबत्तेचा अनुभव येऊ लागलेला आहे. प्रत्येक व्यक्तीला काही किमान आर्थिक स्वातंत्र्य, स्वायत्तता बहाल करणा-या या भौतिक सुबत्तेपायी परस्परांच्या नात्यांमधील वीणही पालटते आहे. या आधीच्या पिढ्यांमध्ये अनुभवास येणारे एकमेकांवरील सर्वांगीण अवलंबन झपाट्याने उताराला लागते आहे. यांमुळे, व्यक्तीव्यक्तींमधील भावनिक नातेसंबंधांचा आलेख ज्या प्रमाणे गुणात्मकरीत्या बदलतो आहे त्याचप्रमाणे व्यक्ती आणि समाज यांच्यादरम्यानच्या नात्याचीही पुनर्मांडणी चालू झालेली आहे. या सगळ्या बदलांचा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे एकंदरीने सर्वत्रच आपल्याला व्यक्तिवादाला बहर येताना दिसतो. वाढत्या व्यक्तिवादापायी समन्वय, संवाद, संस्कृतिकारण...यांसारख्या सगळ्यांच संज्ञा-संकल्पनांना आताशा वेगळा अर्थ प्राप्त होताना दिसतो. विस्तारणा-या या व्यक्तिवादामधून निपजणा-या ऊर्मी विलक्षण रसरशीत आणि बहुआयामी दिसतात. आपल्या देशातील कोणत्याही कानाकोप-यात सहज डोकवले तरी भन्नाट कल्पनांनी झपाटून गेलेली सर्जनशील अशी अगणित माणसे आपापल्या परीने ठिकठिकाणी कार्यरत असलेली दिसतात. कमालीच्या सर्जक अशा या ऊर्मीचे 'चॅनेलायझेशन' घडवून आणणे हेच आजचे एक मोठे आव्हान ठरते आहे.

भारतीय संस्कृतीच्या आजवरच्या वाटचालीवर नजर टाकली तर या प्रदीर्घ प्रवासादरम्यानचे दोन कालखंड लक्षणीय दिसतात. 'वैदिक काळ' आणि 'प्रबोधन काळ' हे ते दोन कालखंड होत. हे दोन्ही कालखंड म्हणजे ज्ञानाच्या उत्कर्षाचे कालखंड होत. वैदिक काळाच्या तुलनेत प्रबोधन युगाचा कालखंड आजच्या काळाला अधिक नजिकचा ठरतो. किंबहुना, ज्या वर्तमानात आज आपण प्रतिक्षणी जगतो आहोत ते वर्तमान प्रबोधन काळाच्या कुशीतूनच निपजलेले आहे, असे म्हणणे अजिबातच चुकीचे ठरणार नाही. तसे बघितले तर, प्रबोधन पर्व हे केवळ नवतंत्रशास्त्राच्या शोधनाचे वा उदयाचे पर्व नव्हते. प्रबोधन युग हे ज्ञानाच्या, नवतंत्रशास्त्राच्या उपयोजनाचे पर्व होते. भारतीय समाज त्या संपूर्ण कालखंडात परकीय शक्तीच्या अमलाखाली होता. त्या उभ्या कालखंडावर एक नजर जरी टाकली तरी, सर्जनाच्या बहुविध प्रेरणा आणि आवाहनांनी भारित झालेल्या त्या युगात, निखळ आत्मानंदासाठी जीवनाच्या नानाविध क्षेत्रांत अखंड कार्यरत असणा-या कर्तृत्ववानांची मालिकाच आपल्या नजरेसमोर उभी ठाकते. मुळात परकीय अंमल असल्यामुळे त्या काळातील अशा सर्जनशील व्यक्तींच्या ठायी वास करणा-या सर्जक प्रेरणांची तत्कालीन सर्व पातळ्यांवरील व्यवस्थांकडून निव्वळ उपेक्षाच झाली. शासनसंस्था काय अथवा विद्यापीठीय व्यवस्था काय, त्या काळातील सर्वतोपरी प्रतिकूलतेच्या फे-यात स्वतःची सर्जनशीलता जपणा-या व फुलवणा-या त्या सगळ्या प्रज्ञावंतांचा यथोचित बहुमान करण्याबाबत या दोन्ही संस्था उदासीनच राहिल्या. आजच्या या २१व्या शतकात तरी आपल्या या समाजात फारसे वेगळे चित्र या संदर्भात दिसते का, असा प्रश्न आपण आपल्यालाच विचारला तर त्याला मिळणारे उत्तर मोठे उल्हासदायी अथवा दिलासादायक अजिबातच नाही. जीवनाच्या अनेक क्षेत्रांत विलक्षण कल्पकतेने कार्यरत असणा-या एकाकी प्रज्ञावंतांना एकत्र आणणारी, त्यांच्या ठायीच्या सर्जनशीलतेचा समन्वय घडवून आणत विविध स्तरांवर आदानप्रदान आणि संवादाची प्रक्रिया पुढे नेणारी व्यासपीठे आपल्या समाजात आज कोठे दिसतात ? असे निर्मितीक्षम आदानप्रदान सतत घडायला हवे, त्यासाठी पूरक व्यासपीठे सक्रिय हवीत, ही जाणीव तरी आपल्याला आज आहे का ?



समाजाच्या अनंत क्षेत्रांमध्ये संजीवन असलेली ही सर्जनशील प्रेरणा आणि त्यांतून धुमारणारे कल्पक प्रकल्प, असे प्रकल्प कार्यान्वित करणारे प्रवाह जागोजागी दृग्गोचर होतात. परंतु, अशा प्रवाहांना कवेत घेणारी व्यासपीठे आपल्याला आजमितीस भवताली दिसत नाहीत. केवळ इतकेच नाही तर, अशा प्रवाहांना सैद्धांतिक अधिष्ठान पुरवणारी वैचारिक व्यासपीठेही आसमंतात दिसत नाहीत. अशा विविध प्रेरणांदरम्यान सततचे आदानप्रदान घडत राहायला हवे. अशा आदानप्रदानाला वाव देणारी व्यासपीठे निर्माण करणे ही आजच्या संस्कृतिकारणाची एक मोठीच गरज आहे. त्यासाठी निकडीचा असणारा अवकाश आपल्याला उपलब्ध होतो आहे का, हाच एक मोठा जटिल सवाल होय. हा अवकाश मुख्यतः असायला हवा भावनिक. १९९० सालानंतरच्या बदललेल्या भौतिक वातावरणात झंझावात दिसतो तो अत्याधुनिक तंत्रशास्त्राचा. या प्रगत तंत्रशास्त्राने मानवी जीवनाच्या कल्याणाचा स्तर उंचावलेला आहे, हे कोणीच अमान्य करणार नाही. परंतु, तो झंझावात आता बेलागपणे चहूंकडून अंगावर येतो आहे. या तंत्रज्ञानाचा जनक असलेला माणूस त्याचा नियंत्रक आहे की, हे तंत्रज्ञानच मनुष्याचे चालक बनते आहे, असा प्रश्न पडावा इतके माणूस आणि तंत्रज्ञान यांच्यादरम्यानचे नाते आताशा बदललेले दिसते. तंत्रज्ञान माणसाच्या अधीन आहे की मनुष्यप्राण्यावर आता तंत्रज्ञान स्वार होते आहे, हा प्रश्न कमालीचा उग्र बनतो आहे. या सगळ्या गदारोळात आपण सगळेच केवळ भौतिक उत्कर्षाच्या पाठलागात गुंतत चाललेलो आहोत. स्वतःचा स्वतःशी असलेला संवाद विकळ बनण्यात या सा-याची परिणती घडते आहे. दुसरीकडे, सगळीकडून रोरावत अंगावर कोसळणा-या जागतिक प्रवाहांच्या रेट्यात आपले स्वत्व कसे जपायचे, हा प्रश्न अधिकाधिक कळीचा आणि दुर्धर बनत चाललेला आहे. आपला स्थायी मूल्यसंचय अबाधित राखत असतानाच नवीन जीवनदृष्टीचा अंगीकार कसा करायचा, हा पेच आपल्या सगळ्यांच्याच पुढ्यात उभा ठाकतो आहे. 'ग्लोबल' आणि 'लोकल' यांचा समन्वय साधत आपले अस्तित्व 'ग्लोकल' कसे बनवायचे, याचा उलगडा करून घेणे सोपे नाही. त्यासाठीही पुन्हा अत्याधुनिक तंत्रज्ञानच आपल्या मदतीला येईल, अशी आशा आहे.

## (२) वाड्.मयीन परंपरेचे प्रगल्भ आकलन अत्यावश्यकच...

**● डॉ. अरूणा ढेरे**

‘‘शब्द, कला यांच्या माध्यमातून आपल्या अंतर्विश्वाचा आविष्कार प्रगट करतो तो साहित्यिक’’, अशी ‘साहित्यिक’ या संकल्पनेची व्याख्या आपण मांडत असतो. साहित्यिका्या अंतर्विश्वाचे असे हे आविष्करण ज्या साहित्यकृतींच्या माध्यमातून साकारत राहते त्या साहित्यनिर्मितीला एकाच वेळी व्यक्तिगत आणि सामाजिक अशी उभय परिमाणे असतात. अंतरंगाचे आविष्करण या रू पाने साहित्यिकाची साहित्यकृती ही पूर्णतः त्याची व्यक्तिगत अशीच असते आणि म्हणूनच प्रत्येक साहित्यकृतीला तिची अशी एक स्वयंसिद्ध स्वायत्तताही लाभलेली असते. परंतु, अशी साहित्यकृती ज्या वेळी समाजमानसाच्या पुढ्यात सादर होते त्या वेळी ती वरकड समाजाला आस्वाद्य बनत असल्याने तिला सामाजिक परिमाण चिकटते आणि तिथे त्या साहित्यकृतीच्या अंगभूत स्वायत्ततेला सामाजिक जबाबदारीचे आणखी एक परिमाण जोडले जाते. त्यांमुळे, साहित्यकृतींची संस्कृतिसंबद्धता ज्या वेळी आपण जाणून घेण्यास प्रवृत्त होतो त्या वेळी त्या संस्कृतिसंबद्धतेला साहित्यिकाची आत्मसंबद्धता आणि सामाजिक स्तरावरील सामाजिक संबद्धता प्राप्त झालेली असते, याचे भान ठेवावेच लागते. साहित्यकाराच्या अंतर्विश्वाचे प्रगटीकरण घडवून आणणारे माध्यम या अर्थाने ज्या वेळी आपण साहित्याकडे बघत असतो त्या वेळी तिथे सर्वोच्च असते ती त्या त्या साहित्यिकाची आत्माविष्काराची अदम्य निकड, पराकोटीची गरज. कोणत्या तरी माध्यमाद्वारे स्वतःला अभिव्यक्त केल्याखेरीज राहावतच नाही, या कडोविकडीच्या प्रेरणेद्वारे साहित्यकृतीची जडणघडण तिथे साकारलेली असते. यापेक्षा निराळी भूमिका त्या सर्जनाच्या मुळाशी संभवतच नसते. परंतु, कोणत्या ना कोणत्या प्रकारची बांधिलकी मानणा-या साहित्याची भूमिका आणि त्याच्या निर्मितीमागील प्रेरणा मात्र वेगळ्या असतात. बांधिलकीद्वारे निपजणा-या साहित्यकृतीच्या मुळाशी आत्माविष्काराच्या निकडीपेक्षाही निर्धारित ईप्सिताच्या प्राप्तीचे माध्यम, उपकरण अथवा हत्यार या नात्याने अथवा रू पाने साहित्याचा प्रसव घडत असतो.



कशाची ना कशाची तरी बांधिलकी जपण्याच्या प्रेरणेद्वारे साकारणा-या साहित्याच्याबाबतीत एक धोका नेहमीच संभवत राहतो. असे साहित्य संकुचित, एकांगी बनण्याचा आणि पर्यायाने संबंधित साहित्यकार अनुदार बनण्याचा तो हा धोका. समाजाचे प्रश्न, नाना क्षेत्रांतील चळवळी, अनेकविध समूहांच्या समस्या यांना अवकाश आणि आवाज प्राप्त करू न देणा-या साहित्यासंदर्भात असा धोका, ही समस्या स्वाभाविकपणेच संभवते. त्याला कोणाचाच इलाज नसतो. परंतु, साहित्याच्या मूळ प्रकृतीशी अशी निर्मिती ही कायमच विसंगत ठरणारी असते, याचे भान मात्र आपण सगळ्यांनीच ठेवावयास हवे. साहित्यकृतीची वैश्विकता, साहित्यकृतीकडून अथवा साहित्यकृतीमध्ये अपेक्षित असलेल्या युगनिरपेक्ष मूल्यांचा जागर यांना बांधिलकीच्या भावनेतून स्त्रवलेल्या साहित्यामध्ये पायबंद घातला जातो, हे वास्तव कधीच नजरेआड करता येणार नाही. विशेषतः, इतिहास आणि साहित्य यांचे परस्परसंबंध समजावून घेताना आपल्याला या वस्तुस्थितीची स्वच्छ जाणीव ठेवावी लागते. इतिहास आणि साहित्य यांचे संबंध विलक्षण गुंतागुंतीचे असतात. त्यांतल्या त्यांत, इतिहासाबाबतची अभिज्ञता बव्हंशी बाल्यावस्थेतच असलेल्या आपल्यासारख्या समाजात तर हे संबंध कमालीचे संवेनशील बनून राहतात. कोणत्याही काळातील साहित्यकृतींकडे इतिहासदृष्टीने बघण्याची क्षमता, सवय आणि संस्कार आपल्या समाजात आजही रुजलेलेच नाहीत. त्यांमुळे, आपल्याच वाड्.मयीन परंपरेबाबतचे आपले आकलन फारच तोकडे आहे. किंबहुना, आपली वाड्.मयीन परंपराच आपल्याला आजवर नीटशी कळलेलीच नसावी, अशी आशंका भवतालातील वातावरण अनुभवताना वारंवार मनामधये उमटत राहते. आपल्या वाड्.मयीन परंपरेबाबतचे आपले आकलन अपुरे आणि अप्रगल्भ असल्यामुळेच असेल कदाचित, पण, ‘धर्मनिरपेक्ष साहित्य’ या शब्दसंहतीचा अर्थ समजावून घेताना आपण घोटाळे करून ठेवतो. धर्मनिरपेक्ष साहित्य म्हणजे धर्मविरोधी साहित्य नव्हे, ही बाब आपण नीटपणे समजावून घ्यावयास हवी. आपल्याला लाभलेल्या वाड्.मयीन परंपरेतील नेमके काय उचलायचे याचे सम्यक् भान विकसित होण्यासाठी प्रथम आपल्या वाड्.मयीन परंपरेचे आपले आकलन प्रगल्भ बनवणे गरजेचे ठरते.

सध्याचा काळ तर प्रचंडच अस्थिरतेचा आहे. परिवर्तनाच्या एका गतिमान पर्वामधून आपण सारे वाटचाल करतो आहोत. या सगळ्या गदारोळाचाही एक प्रकारे साहित्यावर दबाव हा येतच असतो. अशा परिवर्तनशील काळात आपण वेठीला धरले जाऊ नये, याची काळजी, याची दक्षता साहित्याला आणि पर्यायाने साहित्यकाराला घ्यावी लागते. बहुअंगी परिवर्तनाच्या काळातून पुढे सरकत असताना जीवनातील संवाद टिकवून धरणे केवळ महत्त्वाचेच नव्हे तर अगत्याचे ठरते. शब्द हे तर संवादाचे मूलद्रव्य. संवाद जपणारे-वाढवणारे माध्यम असणारा हा शब्द भारित करणे, ही परिवर्तनपर्वादरम्यानची साहित्यिकांची जबाबदारी ठरते. संवादाच्या प्रेरणा आणि संवादाची प्रक्रिया कोणत्याही पद्धती संकुचित, बंदिस्त बनू नये, याची काळजी प्रत्येकानेच घ्यावी लागते. आपल्या सा-या संवादाचे लक्ष्य बहुसंख्याक समाज सतत राहावा, याची दक्षता बाळगणे हेसुद्धा साहित्यिकांचेच उत्तरदायित्व ठरते. भाषेची जपणूक महत्त्वाची ठरते ती नेमकी याचसाठी. आपली भाषा, त्या भाषेच्या आधाराने बहरलेली आपली वाड्.मयीन संस्कृती यांबाबतची आस्था सर्वसाधारणपणे ओसरणीला लागलेली आहे, अशी खंत आपण सगळेच व्यक्त करत असतो. परंतु, भाषा आणि वाड्.मयीन संस्कृती यांचे जतन-संवर्धन सहजासहजी घडत नसते. भाषा काय अथवा वाड्.मयीन संस्कृती काय, ती डोळसपणे जतनच करावी लागते. त्यासाठी कष्ट घ्यावे लागतात, हे तर ओघानेच आले. ही जबाबदारी सगळ्यांचीच असते हे खरे असले तरीही, या संदर्भात साहित्यिक, शिक्षक, पालक अआणि मुख्य म्हणजे आपली कुटुंबसंस्था यांच्यावर जबाबदारीचे ओझे तुलनेने अधिक असते. साहित्य हे मानवी समाज एकंदरीनेच अधिक सुसंस्कृत बनवण्याचे मूलद्रव्य होय, याची जाणीव आपल्यापैकी किती जणांना असते, हा प्रश्न आपण आपल्यालाच विचारू न बघायला हवा. जबाबदार, सुसंस्कृत माणूस आणि नागरिक म्हणून जगण्यासाठी साहित्य, साहित्याचे वाचन, वाचनाचे संस्कार, वाचनसंस्कृती या जीवनातील अत्यावश्यक बाबी होत, ही जाणीव जनमानसामध्ये रुजवणे ही सगळ्यांचीच जबाबदारी होय. ही जाणीव समाजमनात खोलवर रुजावी यासाठीदेखील आवर्जून आणि नेटाने प्रयत्न करत राहणे आवश्यक असते.



आपल्या जगण्याचा आशय अधिक निकोप, सकस बनवायचा तर इहवाद आणि इहवादी जीवनदृष्टी अधिक व्यापक, समंजस, कसदार बनवणारी मूल्यनिष्ठा बळकट करणे अनिवार्य ठरते. साहित्यिक आणि साहित्य या दोहोंची या संदर्भातील भूमिका विलक्षण कळीची असते. त्यासाठीच साहित्य, साहित्यनिर्मितीची प्रक्रिया, ती प्रक्रिया फुलवण्यास साहाय्यभूत होणारे पर्यावरण आणि साहित्यकार मोकळे असावे लागतात. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, साहित्यिक स्वातंत्र्याचा संकोच अलीकडील काळात होऊलागलेला आहे, अशी हाकाटी पिटली जाताना आपण ऐकतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा पैस संकुचित बनवणारे हे घटक नेमके आहेत तरी कोठले, याचाही धांडोळा निखळ दृष्टीने आपणच घ्यावयास हवा. साहित्यिक स्वातंत्र्याला व्यवहारात अनेकदा मर्यादा पडतात त्या कोणत्या ना कोणत्या स्वरू पाची बांधिलकी स्वीकारण्यानेच. म्हणजेच, अभिव्यक्तीसंदर्भातील पातरंत्र्य हे अनेकदा बव्हंशी स्वनिर्मितच असते. आपल्या अभिव्यक्तीस्वातंत्र्याची कक्षा आक्रसून जाऊ नये यासाठी दक्ष राहण्याचे धैर्य साहित्यिकांना मिळत राहते ते वाड्.मयीन परंपरेतील चिरंतन मूल्यांशी जपलेल्या निष्ठांद्वारेच.

## (३) जातविचाराला शह भांडवलाचा...

**• मिलिंद कांबळे**

अर्थकारण हा समग्र मानवी व्यवहारांचा आणि पर्यायाने त्या मानवी व्यवहारांचा पार्श्वपट असणा-या संस्कृतिकारणाचा एक महत्त्वाचा असा जैविक घटक राहिलेला आहे. साहजिकच, व्यापक संस्कृतिकारणामध्ये कालपरत्वे साकारणा-या स्थित्यंतरांचे पडसाद आपल्याला अर्थकारणाच्या प्रांगणामध्ये उमटताना ऐकू येतात. तर, अर्थकारणातील बदल संस्कृतिकारणाच्या जडणघडणीला हातभार लावत असतात. भारतीय अर्थवास्तवातील ग्रामीण अर्थकारण या वस्तुस्थितीची प्रचीती आपल्याला आणून देते. परंपरेने श्रेणीबद्ध राहत आलेल्या ग्रामीण समाजकारणात परंपरेनेच उपेक्षित राखलेल्या, तथाकथित 'दलित' म्हणून समजल्या जाणा-या जातसमूहांचा, ग्रामीण अर्थकारणाचा चेहरामोहरा निश्चित करण्यात अतिशय कळीचा सहभाग राहत आलेला आहे, ही बाब अनेकदा आपल्याला नीट आकळतच नाही.

ग्रामीण अर्थव्यवस्था गतिमान राखण्यात, तथाकथित 'दलित' म्हणून निर्देश होत आलेल्या जनसमूहांचा वाट परंपरेनेच मोठा राहत आलेला आहे. या जातसमूहांमधील नानाविध घटक ग्रामीण अर्थकारणातील अनेकविध सेवा पुरविण्यात आघाडीवर राहिलेले आहेत, हे आपल्या जुन्या गावगाड्यातील श्रमविभागणीचा ढाचा डोळ्यांसमोर आणला तर आपल्या ध्यानात येईल. गावगाड्यातील त्या त्या सेवेच्या पुरवठ्यासाठी, गावराहाटीमध्ये वाट्याला आलेले सेवेचे अथवा उत्पादनाचे काम करण्यासाठी आवश्यक असलेली उत्पादक स्वरूपाची कौशल्ये या समाजसमूहांतील घटकांच्या ठायी पिढ्यान्‌पिढ्या संक्रमित होत आलेली होतीच. श्रेणीबद्ध समाजरचनेपायी आणि त्या त्या जातीने तिचाच वंशपरंपरागत व्यवसाय करण्याच्या सक्तीपायी त्या उद्यमशीलतेला फुलायला इतका प्रदीर्घ काळ अवकाशच मिळाला नव्हता, हे कटू वास्तव आहे. परंतु, १९९०च्या दशकाच्या प्रारंभी भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक पुनर्रचनेचे जे पर्व अवतरले त्यांद्वारे आर्थिक पुनरुत्थानाच्या अक्षरशः अनंत वाटा दलित समाजातील होतकरूउद्यमशीलांसाठी खुल्या झाल्या. १९५० साली आपल्या देशात केंद्रिय नियोजन आयोग अस्तित्त्वात आला आणि त्या नंतर पुढील चार दशके भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये नियोजबद्ध विकासाचे पर्व नांदले. १९९० सालानंतर जे आर्थिक पुनर्रचनेचे पर्व भारतीय अर्थकारणामध्ये अवतरले त्यांद्वारे भारतीय समाजातील पारंपरिक श्रेणीबद्ध संरचनेचा जैविक घटक असलेल्या जातव्यवस्थेचे बुरुज खिळखिळे बनत आहेत, असे आपल्या ध्यानात येते. खुल्या बाजारपेठीय व्यवस्थेच्या नियमांनुसार गतिविधी असणा-या अर्थसंस्कृतीचा विस्तार उदारीकरण पर्वादरम्यान क्रमाने घडून येऊ लागला. परिणामी, भारतीय समाजातील अनेक जातसमूहांवर अनंत काळापासून लादली गेलेली त्यांचे त्यांचे परंपरागत, जातिनिष्ठ व्यवसायच करण्याची सक्ती विरळ होऊ लागली. श्रेणीबद्ध समाजरचनेच्या तळाशी दडपल्या गेलेल्या या जातसमूहांच्या ठायी परंपरेनेच वसत आलेल्या बहुविध व्यावसायिक कौशल्यांच्या अभिव्यक्तीस, त्या खुलेपणाद्वारे, उदंड संधींचे अनेकानेक दरवाजे एकदम सताड उघडले गेले. लखनौजवळच्या एका गावात आम्ही असेच अलीकडे गेलो होतो. त्या गावातील बड्या जमीनदार असामीला भेटण्याचा योग त्या दरम्यान आला.



चर्चेदरम्यान तो जमीनदार सतत कुरकुरत होता की, त्याच्या बारदान्यातील गाईगुरे राखायला-चारायला आताशा माणसेच मिळत नाहीत म्हणून. मोठ्या शेतकरी जमीनदारांची गाईगुरे चारायला नेणे हाच ज्यांचा पारंपरिक व्यवसाय होता अशा 'चरवाह' या समाजातील अनेक तरूण आता रोजीरोटीच्या शोधार्थ मोठ्या शहरांकडे निघून गेल्यामुळे जमीनदारांच्या गोधनामागे हिंडायला आता तिथे मनुष्यबळच मिळेनासे झालेले आहे. विस्तारणा-या बाजारपेठांद्वारे नव्याने निर्माण होत असणा-या रोजगारसंधींच्या माध्यमातून भारतीय समाजातील एकंदरच चलनवलन (मोबिलिटी) वाढलेली दिसते. साहजिकच, त्यांतून सर्व स्तरांवरील सामाजिक अभिसरणालाही गती आलेली आहे. वाढत्या संधींद्वारे समाजाच्या विविध स्तरांतील क्रयशक्तीमध्ये कमी-अधिक प्रमाणात वाढ घडून येते आहे, आलेली आहे. बदलत्या आहारशैलीमध्ये, पालटणा-या पेहरावांमध्ये तिचे प्रतिबिंब डोकवते आहे. एके काळी आमच्या समाजात खाण्यापिण्याच्या सवयीदेखील जातसंबद्ध होत्या. खानपानाचे आकृतिबंध त्या त्या जातसमूहाच्या वाट्याला आलेल्या आर्थिक परिस्थितीइतकेच सांस्कृतिक घटकांनीही निर्धारित केलेले असायचे. साहजिकच, मोठ्या शहरांमधील दलित वस्त्यांमध्ये, काही वर्षांपूर्वी, केवळ दैनंदिन गरजेच्या जिनसांची विक्री करणारीच दुकाने काय ती दिसून यायची. आता, त्याच दुकानांवर नजर टाकली तरी अलीकडील काळात घडून आलेला एक ठळक बदल डोळ्यांत भरतो. रोजम-र्याच्या गरजेच्या वस्तूंबरोबरच अन्नधान्येतर अन्य जिनसांचीही हजेरी या दुकानांमधून आपल्याला वाढत्या प्रमाणात लागताना दिसते. परिसरातील क्रयशक्ती वाढलेली आहे, या वास्तवाचे ते प्रतिबिंब होय. पुण्यातील ताडीवाला रस्त्याच्या परिसरात एक झोपडवस्ती आहे. ठिकठिकाणाहून पुण्यात स्थलांतरित झालेल्या मागास, दलित जातसमूहातील घटकांची तिथे पूर्वापारची वस्ती. अगदी पूर्वी मटण-चिकन विक्रीचे त्या वस्तीमध्ये केवळ एकच दुकान होते. आज त्याच वस्तीमधील दुकानांची संख्या आणि त्यांतील वैविध्य नजरेत भरावे इतपत वाढलेले आपल्याला दिसते. पूर्वी त्या वस्तीमध्ये हातगाडीवरून विक्रीसाठी फेरीवाले भाजीपाला घेऊन येत असत. आज त्याच वस्तीमध्ये चांगल्यापैकी सुविहित मंडई स्थापन झालेली दिसते.

परिसरातील जनसमूहांची क्रयशक्ती अलीकडील काळात वाढलेली आहे, या वास्तवाच्या या सा-या खुणा होत. बदलत्या भौतिक पर्यावरणाबरोबरच दलित नवपिढ्यांची मानसिकताही बदलते आहे. बदललेले हे वास्तव आपण नीट समजावून घ्यावयास हवे. तथाकथित 'दलित' म्हणून गणल्या गेलेल्या समाजसमूहांमध्ये देशभरात आजमितीला साधारणपणे १९ ते २० कोटी तरूण वयाच्या पस्तिशीच्या आतील आहेत. या तरुणांमध्ये प्रचंड अशी सर्जनशील ऊर्जा दडलेली आहे. उदारीकरणाचे पर्व भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अवतरेपर्यंत दलित समाजातील तरूण पिढी एकतर राजकारणामध्ये तरी सक्रिय बनत असे अथवा सरकारी नोकरी पदरात पाडून घेण्यासाठी तरी धडपडत असे. राजकारण आणि सरकारी नोकरी या दोनखेरीज तिसरा पर्यायच दलित समाजसमूहांतील तरूणांच्या मानसिक पर्यावरणामध्ये अंकुरत नसे. परंतु, हे चित्र १९९० सालानंतर झपाट्याने पालटले. आजही ते स्थित्यंतर गतिमानच आहे. आता, राजकारण आणि सरकारी नोकरी या पूर्वापारच्या चाकोरीबद्ध दोन पर्यायांखेरीज उद्योजकतेचा, उद्यमशीलतेचा तिसरा पर्याय दलित समाजांतील होतकरू तरूण रक्ताला वेगाने उपलब्ध होतो आहे. माझ्या दृष्टीने हा बदल अत्यंत सूक्ष्म परंतु विलक्षण महत्त्वाचा आणि मननीय आहे. उत्तर प्रदेशात ज्या काळात माननीय कांशीराम यांच्या नेतृत्त्वाचा उदय झाला त्या वेळी दलित समाजसमूहांमध्ये एका नवीन राजकीय जाणिवेचा उगम झालेला आपण पाहिला. अगदी खेड्यापाड्यांतील दलित वस्त्यांमध्ये फेरफटका मारला तरी दलित समाजातील कुटुंबांच्या दरवाजांवर, 'हमें अब सत्ताधारी बनना हैं' असे वाक्य लिहिलेले आढळत असे. त्या घोषवाक्यातून दलित समाजसमूहांमध्ये निर्माण झालेल्या नवीन आत्मभानाची परिणतीही आपण सगळ्यांनीच अनुभवलेली आहे. आज, उदारीकरणानंतर पुरपूर पाव शतक उलटून गेलेले आहे. आजचे वास्तव पूर्णतः निराळे आहे. काळ बदलला की चळवळींचे, लढ्याचे स्वरूपही बदलते, नव्हे ते बदलावे लागते. आज, जातीशी आणि जातसंबद्ध विचारप्रणालीशी झगडण्यासाठी आम्हांलाही नवीन हत्यार शोधावे लागणार आहे. आणि ते हत्यार आहे 'भांडवल'. इथून पुढच्या काळात जातिनिष्ठ विचारविश्वाला भांडवलाचा शह बसणार आहे.



'दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रिज्'च्या (डिक्की) माध्यमातून त्याच नवीन जाणिवेला अवकाश प्राप्त करून देण्याचा प्रयत्न आरंभलेला आहे. ''आम्हांला नोक-या मागणारे नव्हे तर नोक-या देणारे बनायचे आहे'', हे 'डिक्की'चे उद्दिष्टवचन होय. दलित समाजसमूहांतील घटकांमध्ये परंपरेने वसत आलेल्या उत्पादक कौशल्यांना विस्तारशील बाजारपेठेशी जोडून देत, या समाजघटकांमधील उद्यमशीलतेचे संवर्धन घडवत दलित समाजघटकांच्या सर्वांगीण उत्थानाला चालना देणे, हा 'डिक्की'च्या कार्याचा गाभा होय. सुमारे अडीच ट्रिलियन अमेरिकी डॉलर (एक ट्रिलियन म्हणजे १० वर १२ शून्ये, म्हणजेच एकावर तेरा शून्ये) इतके घसघशीत आकारमान असणा-या भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये मागास जनसमूहांच्या अर्थव्यवसायांचा हिस्सा काही नाही म्हटले तरी किमान १० ते १५ टक्क्यांच्या घरात आजमितीस आहे. या वास्तवाची म्हणावी अशी दखल मुख्य प्रवाहातील कोणीच आज घेताना दिसत नाही. अर्थकारणातील या वाढत्या सहभागाबरोबरच आजच्या दलित अभ्यासक तसेच समूहांचे भावविश्वही बदलते आहे. आता, राजकारण आणि/अथवा आरक्षण, सरकारी नोक-या...अशांसारख्या मुद्यांऐवजी दलित समाजातील अभ्यासक अर्थसंकल्प, अर्थसंकल्पातील तरतुदी, 'दलित' समजल्या जाणा-या समाजघटकांसाठी अर्थसंकल्पात सुचविण्यात आलेले उपक्रम, त्यांसाठी करण्यात आलेल्या वित्तीय तरतुदी यांसारख्या बाबींसंदर्भात हिरिरीने चर्चा, विचारविमर्श करताना दिसतात. विस्मयाची बाब म्हणजे दलित समाजातील राजकीय आणि बौद्धिक नेतृत्त्व मानसिकदृष्ट्या आजही बव्हंशी १९५०च्या दशकातच अडकून पडलेले आहे. नवीन प्रवाहाशी जोडून घेणे त्याला जमलेले नाही.■■

**प्रमुख संदर्भ**

**(A) Books/Reports :**

(1) Economic Survey 2016-17, Volume 2, Government of India, Ministry of Finance, Department of Economic Affairs, Economic Division, published by Oxford University Press, New Delhi, 110 002, 2007.

(2) International Labour Organization : World Employment and Social Outlook Trends, 2008. ■■

नियतकालिकांच्या मालकी हक्क व इतर तपशीलाबाबत फेब्रुवारीनंतर प्रसिद्ध होणा-या पहिल्या अंकामध्ये प्रसिद्ध करावयाचे प्रगटन, नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबत केंद्र सरकारच्या १९५६ मधील नियम (क्रमांक ८)नुसार फॉर्म ४

| | |
|---|---|
| (१) नियतकालिकाचे नाव : | 'अर्थबोधपत्रिका' |
| (२) प्रकाशनस्थळ : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (३) नियतकालिकाचे स्वरूप : | मासिक |
| (४) प्रकाशकाचे नाव : | व्ही. एस. चित्रे |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (५) मुद्रकाचे नाव : | व्ही. एस. चित्रे |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (६) संपादकांचे नाव : | अभय टिळक |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (७) मुद्रणस्थळ : | एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवारपेठ, पुणे - ४११०३० |
| (८) नियतकालिकाच्या मालकांचे किंवा एकूण भांडवलापैकी एक टक्क्यांहून अधिक भाग धारण करणा-या भागधारकांची नावे व पत्ते : | 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) 'अर्थबोध,' ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६ |

मी, व्ही. एस. चित्रे याद्वारे प्रमाणित करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

व्ही. एस. चित्रे

दिनांक - १ मार्च २०१३

(प्रकाशकाची सही)



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PCW/115/2016-2018
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

●विकास चित्रे ●किशोर चौकर ●सुरिंदर जोधका ●रमानाथ झा
●अभय टिळक ●रवींद्र ढोलकिया
●ललित देशपांडे ●दिलीप नाचणे ●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे
●नीळकंठ रथ ● रूपा रेगे - नित्सुरे ● एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**